Exampapers247 राज्यसेवा (मुख्य) परीक्षा - 2016 Exampapers247
परीक्षा दि. 28 सप्टेंबर, 2016

# A

**2016**

**CODE : DO8**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.

**प्रश्नपुस्तिका-2**
**मराठी व इंग्रजी**

वेळ : 1 (एक) तास

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉल्पेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

↑ केंद्राची संकेताक्षरे ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक तीन चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

1. खालील शब्द व त्यांचे अर्थ यांच्या **योग्य** त्या जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | प्रतीची | (i) | संकेत |
| (b) | प्रतीती | (ii) | पश्चिम दिशा |
| (c) | प्रत्यही | (iii) | अनुभव |
| (d) | प्रतीक | (iv) | नेहमी |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (2) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (3) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (4) | (iii) | (i) | (ii) | (iv) |

---

2. उभी जोडणी आणि आडवी जोडणी असलेले कोणते शब्द **बरोबर** आहेत ते लिहा ?

(a) अन्न (b) फन्ना (c) मुद्दा (d) मुद्‌दा

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (c) बरोबर (b), (d) चूक (2) (b) आणि (d) बरोबर (a), (c) चूक

(3) सर्व बरोबर (4) सर्व चूक

---

3. योग्य जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | मांजराने उंदीर खाऊन टाकला | (i) | अकर्तृक क्रियापद |
| (b) | शिंक्याचे तुटले | (ii) | द्विकर्मक क्रियापद |
| (c) | विदुषक मुलांना हसवितो | (iii) | सहायक क्रियापद |
| (d) | मुलांनी चावऱ्या कुत्र्याला खडे मारले | (iv) | प्रयोजक क्रियापद |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (2) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (3) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| (4) | (iii) | (i) | (iv) | (ii) |

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

4. 'एका हाताने टाळी वाजत नाही'. या वाक्यातील 'नाही' या क्रियापदास काय म्हणतात?

(1) अनियमित क्रियापद (2) शक्य क्रियापद

(3) प्रयोजक क्रियापद (4) सिद्ध क्रियापद

5. 'चांगला औषधोपचार लाभावा म्हणून तो मुंबईस गेला'.

या वाक्यातील 'म्हणून' या अव्ययास काय म्हणतात?

(1) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय (2) संकेतबोधक, उभयान्वयी अव्यय

(3) उद्देशबोधक उभयान्वयी अव्यय (4) कारकबोधक उभयान्वयी अव्यय

6. खालील 'म्हण' अचूक शब्दाने पूर्ण करा.

'सारा चोरांचाच __________'

(1) मामला (2) कारभार (3) बाजार (4) गोंधळ

7. 'घोडा घोडा खेळू चला। मौज घडीभर करू चला' या वाक्यातील अधोरेखित शब्दाचा प्रकार ओळखा.

(1) अभ्यस्त शब्द (2) सामासिक शब्द (3) पूर्णाभ्यस्त शब्द (4) अंशाभ्यस्त शब्द

8. 'हिरवे हिरवे गार गालिचे' या ओळीतील विशेषणाचा प्रकार कोणता?

(1) क्रमवाचक विशेषण (2) आवृत्तिवाचक विशेषण

(3) गुणवाचक विशेषण (4) गणनावाचक विशेषण

9. अधोरेखित शब्द समूहाचे योग्य उत्तर कोणते?

त्याचा धाकटा मुलगा आज फुटबॉलच्या सामन्यात चांगला खेळला.

(1) उद्देश्य विस्तार (2) उद्देश्य (3) विधेय विस्तार (4) विधेय

10. 'ती नियमितपणे वर्तमानपत्र वाचीत असे' या वाक्यातील काळ ओळखा.

(1) अपूर्ण वर्तमानकाळ (2) पूर्ण वर्तमानकाळ

(3) रीतिवर्तमानकाळ (4) रीतिभूतकाळ

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

11. वाक्प्रचार व त्याचा अर्थ यांच्या योग्य जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | ओटी भरणे | (i) | सुखरूप प्रसूत होऊन बाळासह |
| (b) | ओटीत घालणे | (ii) | दत्तक देणे |
| (c) | ओटीत देणे | (iii) | आश्रयाखाली देणे, सांभाळायला देणे |
| (d) | भरल्या ओटीने | (iv) | सुवासिनीच्या पदरात तांदूळ, सुपारी, नारळ, हळकुंड इ. पदार्थ घालणे |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (i) | (iii) | (iv) | (ii) |

12. 'सर्वांना समज दिली जाईल' या वाक्याचा प्रयोग ओळखा.

(1) शक्यकर्मणी (2) कर्मकर्तरी (3) पुरुषकर्मणी (4) भावकर्तरी

13. काळ आणि त्यांच्या व्याख्या यांच्या जोड्या लावा.

| | **व्याख्या** | | **काळ** |
|---|---|---|---|
| (a) | वाक्यातील क्रिया पुढे होईल असा बोध होतो तेव्हा | (i) | भूतकाळ |
| (b) | वाक्यातील क्रिया पूर्ण झाली, की, | (ii) | वर्तमानकाळ |
| (c) | वाक्यातील क्रिया चालू असल्याचे दर्शविते तेव्हा | (iii) | रीति भूतकाळ |
| (d) | वाक्यातील क्रिया भूतकाळी तरीही, वरचेवर होत असे; असा बोध | (iv) | भविष्यकाळ |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (2) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (3) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (4) | (i) | (iv) | (iii) | (ii) |

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

**14.** शब्द व समास यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | क्रीडांगण | (i) | कर्मधारय तत्पुरुष समास |
| (b) | पीतांबर | (ii) | नञ् तत्पुरुष समास |
| (c) | जलद | (iii) | विभक्ती तत्पुरुष समास |
| (d) | अयोग्य | (iv) | उपपद तत्पुरुष समास |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (3) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

**15.** खाली मराठी व्याकरणातील संधीचे काही प्रकार व त्यांची उदाहरणे दिलेली आहेत.

| | **संधी** | | **उदाहरण** |
|---|---|---|---|
| (a) | सजातीय स्वरसंधी | (i) | भेटून |
| (b) | विजातीय स्वरसंधी | (ii) | नाहीसा |
| (c) | पूर्वरूप स्वरसंधी | (iii) | गोलाकार |
| (d) | पररूप स्वरसंधी | (iv) | रामेश्वर |

उत्तरासाठी **योग्य** तो पर्याय निवडा :

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (2) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (3) | (i) | (ii) | (iv) | (iii) |
| (4) | (ii) | (iii) | (i) | (iv) |

**16.** 'अलीकडे मी तुम्हाला एकही पत्र लिहिले नाही' या वाक्याच्या वाक्यपृथक्करणाच्या जोड्या लावा.

| | **वाक्य** | | **वाक्यपृथक्करण** |
|---|---|---|---|
| (a) | अलीकडे | (i) | क्रियापद |
| (b) | मी | (ii) | विधेयविस्तार |
| (c) | तुम्हाला एकही पत्र | (iii) | कर्म व कर्मविस्तार |
| (d) | लिहिले नाही | (iv) | उद्देश्य |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (2) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (3) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| (4) | (i) | (ii) | (iv) | (iii) |

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

17. पुढील विधाने वाचून **योग्य** उत्तर लिहा.

(a) क्रियापदांना काळ व अर्थ यांचे विकार होतात.

(b) कधी कधी वर्तमानकाळाच्या किंवा भूतकाळाच्या क्रियापदरूपावरून भविष्यकाळाचा आशय व्यक्त होतो.

(c) संकेतार्थी क्रियापदे भूतकाळी असतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (b) व (c) चूक (2) फक्त (b) बरोबर

(3) फक्त (c) चूक (4) फक्त (a) व (c) बरोबर

---

18. पुढीलपैकी शब्दसाधित वा तद्धित ओळखा :

(a) यादव (b) खडकाळ (c) माय (d) कर्ण

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) बरोबर (c), (d) चूक (2) (a) आणि (c) बरोबर (b), (d) चूक

(3) (c) आणि (d) बरोबर (a), (b) चूक (4) सर्व बरोबर

---

19. व्यंजनांच्या लेखाकाराच्या जोड्या लावा :

(a) दंड नसलेले व्यंजन (i) ळ्

(b) मध्ये दंड असलेले व्यंजन (ii) प्

(c) जोडलेला दंड असलेले व्यंजन (iii) फ्

(d) अर्ध दंड असलेले व्यंजन (iv) र्

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (i) | (iv) | (iii) | (ii) |
| (3) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (4) | (iv) | (i) | (iii) | (ii) |

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

20. 'अ' गटात सर्वनामांचे प्रकार व 'ब' गटात ती सर्वनामे वापरलेली वाक्ये दिली आहेत. त्यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| (a) | दर्शक सर्वनाम | (i) | जो करेल तो भरेल |
| (b) | प्रश्नार्थक सर्वनाम | (ii) | हे पुस्तक कोणी फाडले? |
| (c) | सामान्य सर्वनाम | (iii) | तो हत्ती पाहा. |
| (d) | संबंधी सर्वनाम | (iv) | कोणी कोणास हसू नये |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (2) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (3) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (4) | (ii) | (iii) | (i) | (iv) |

21. खालील व्यंजनगटातील 'महाप्राण' व्यंजनाचा गट ओळखा :

(1) य्, र्, ल्, व् (2) ख्, घ्, छ्, झ् (3) अ, आ, ई, ऊ (4) त्, द्, प्, च्

22. गटाबाहेरचा शब्द कोणता?

(1) अपुरा (2) नास्तिक (3) बेडर (4) जलद

23. प्रतिक्षण, कष्टसाध्य, घरोघरी, अन्याय यापैकी अव्ययीभाव समासाचे शब्द ओळखा :

(1) प्रतिक्षण ; घरोघरी (2) कष्टसाध्य ; अन्याय
(3) कष्टसाध्य ; घरोघरी (4) घरोघरी ; अन्याय

24. (a) अर्णवाने आपले रूप दाखवले.
(b) रत्नाकर दिमाखदार दिसत होता.
(c) सिंधू कधी नमतं घेत नाही.
(d) मृगेंद्राचे अस्तित्वच वेगळे आहे.

यांपैकी 'समुद्र' या शब्दाशी समांतर असणाऱ्या अर्थाची विधाने असणारा पर्याय ओळखा :

(1) (a), (b), (c) (2) (b), (c), (d) (3) (a), (c), (d) (4) (a), (b), (d)

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

25. पुढील वाक्प्रचाराचा अर्थ कोणता ते लिहा ?

अंत पाहणे

(a) एखाद्याकडून निघेल तितके काम करून घेणे.

(b) एखाद्याच्या कर्तृत्वशक्तीचा, सहनशक्तीचा पूर्णपणे उपयोग करून घेणे.

(c) एखाद्याला पुरतेपणी कसास लावणे.

(d) एखाद्याला छळणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (d) बरोबर, बाकी सर्व चूक (2) (c) आणि (b) बरोबर, बाकी सर्व चूक

(3) सर्व चूक (4) सर्व बरोबर

---

26. पुढील विधाने वाचून **योग्य** पर्याय निवडा.

(a) शब्दांच्या पाठीमागे उपसर्ग लागून उपसर्गघटित शब्द बनतात.

(b) सर्वनामांना तद्धित प्रत्यय लागून नवीन शब्द तयार होतात.

(c) तद्धित आणि कृत् असे साधित प्रत्ययांचे दोन प्रकार आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) चूक

(3) फक्त (a) व (b) बरोबर (4) फक्त (b) व (c) बरोबर

---

27. खालील शब्दांची **बरोबर** संधी ओळखा :

(a) वाक्ताडन = वाग् + ताडन

(b) क्षुत्पिपासा = क्षुध् + पिपासा

(c) षण्मास = षट् + मास

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) बरोबर (2) (a) आणि (b) बरोबर

(3) केवळ (c) बरोबर (4) (a), (b), (c) बरोबर

---

28. खालील वाक्याचा प्रकार सांगा.

'वडिलधारी माणसे म्हणतात, की प्रत्येकाने आपले कर्तव्य पार पाडावे'.

(1) प्रधान वाक्य (2) केवल वाक्य (3) मिश्र वाक्य (4) संयुक्त वाक्य

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

29. पुढील वाक्ये वाचा.

(a) संयुक्त वाक्यात दोन किंवा अधिक वाक्ये एकत्र जोडलेली असतात.

(b) मिश्रवाक्यात प्रधानवाक्यावर गौण वाक्य अवलंबून असते.

(c) 'तुला कांदा आवडतो तर लसूण का आवडू नये' हे संयुक्त वाक्य होय.

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व विधाने बरोबर (2) फक्त (a) व (c) बरोबर

(3) फक्त (c) चूक (4) फक्त (a) बरोबर

---

30. पुढीलपैकी कोणता शब्द व्याकरणदृष्ट्या **बरोबर** आहे ?

(a) सहस्त्ररश्मि (b) सहस्त्ररश्मी (c) सहस्त्ररश्मी (d) सहर्स्त्ररश्मी

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) बरोबर (b), (c), (d) चूक (2) (b) बरोबर (a), (c), (d) चूक

(3) (d) बरोबर (a), (b), (c) चूक (4) (c) बरोबर (a), (b), (d) चूक

---

31. खालीलपैकी कोणत्या गटातील शब्द 'भुंगा' या अर्थी वापरले जातात ?

(a) तनुज, पादप (b) मिलिंद, भ्रमर (c) सारंग, समीरण (d) अली, मधुप

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) व (d) बरोबर

(3) फक्त (c) व (d) बरोबर (4) फक्त (c) चूक

---

32. खालील विधाने वाचा व **योग्य** पर्याय निवडा.

(a) जो विकारी शब्द नामाची व्याप्ती मर्यादित करतो त्यास विशेषण म्हणतात.

(b) ज्या शब्दांपासून कालगत क्रियेचा बोध होतो त्या शब्दांस क्रियापदे असे म्हणतात.

(c) सर्वनाम ही नामाप्रमाणे लिंग, वचन व विभक्ती विकार धारण करणारी शब्दजाती नाही तर ती स्वतंत्र आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) बरोबर (2) (b) व (c) बरोबर

(3) (a) व (c) बरोबर (4) (a), (b), (c) बरोबर

---

33. पुढील वाक्यातील प्रयोग ओळखा.

वडिलांनी मुलाला शाळेत घातले.

(a) कर्तृकर्मसंकर (b) कर्तृभावसंकर

(c) कर्मभावसंकर (d) यापैकी कोणताही नाही

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर बाकी सर्व चूक (2) फक्त (b) बरोबर बाकी सर्व चूक

(3) फक्त (d) बरोबर बाकी सर्व चूक (4) फक्त (c) बरोबर बाकी सर्व चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

34. खालील विधानांचे एक केवलवाक्य करा :

'पुष्कळ वर्षे झाली. मी कॅशियाचे रोप आणले. बागेत एका कोपऱ्यात ते लावले. याची मला मोठी आवड होती'.

(1) पुष्कळ वर्षांपूर्वी मोठ्या आवडीने कॅशियाचे रोप आणून मी ते बागेत एका कोपऱ्यात लावले.

(2) पुष्कळ वर्षांपूर्वी मी कॅशियाचे रोप आणून ते बागेत एका कोपऱ्यात आवडीने लावले.

(3) पुष्कळ वर्षांपूर्वी मी कॅशियाचे रोप आणून बागेत कोपऱ्यात लावले ज्याची मला मोठी आवड होती.

(4) पुष्कळ वर्षांपूर्वी मोठ्या आवडीने कॅशियाचे रोप आणून मी बागेत ते एका कोपऱ्यात आवडीने लावले.

---

35. पुढीलपैकी कोणते विधान व्याकरण नियमानुसार **अचूक** आहे ?

(a) कर्मणी वाक्यात कर्मे एकापेक्षा अधिक असतील; व ती भिन्नलिंगी आणि भिन्नवचनात असतील; तर वाक्यात शेवटी येणाऱ्या कर्माप्रमाणे क्रियापदाचे रूप होईल.

(b) कर्मणी वाक्यात कर्मे एकापेक्षा अधिक असतील; व ती भिन्नलिंगी आणि भिन्नवचनात असतील; तर वाक्यात प्रथम येणाऱ्या कर्माप्रमाणे क्रियापदाचे रूप होईल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) दोन्ही बरोबर (2) (a) आणि (b) दोन्ही चूक

(3) (a) बरोबर (b) चूक (4) (b) बरोबर (a) चूक

---

36. मराठी उपसर्ग लागून तयार न झालेला शब्द कोणता ?

(1) बिनचूक (2) अबोल (3) पडछाया (4) अवघड

---

37. पुढील शब्दांपैकी कोणता शब्द व्याकरणदृष्ट्या **बरोबर** आहे ते लिहा :

(a) द्वर्थी (b) द्विर्थी (c) द्वयर्थी (d) द्विअर्थी

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) बरोबर (b), (c), (d) चूक (2) (d) बरोबर (a), (b), (c) चूक

(3) (c) बरोबर (a), (b), (d) चूक (4) (b) बरोबर (a), (c), (d) चूक

---

38. खाली दिलेल्या शब्दांमधील शुद्ध शब्दांचा पर्याय निवडा :

(a) आशीर्वाद, क्षितीज (b) आशिर्वाद, क्षितिज

(c) क्षितिज, आशीर्वाद (d) आर्शीवाद, क्षितिज

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (c) बरोबर

(3) (a) आणि (c) बरोबर (4) फक्त (d) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

39. पुढील कर्मणी प्रयोगांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | त्याला काम करवते | (i) | समापन कर्मणी |
| (b) | त्याचे पत्र लिहून झाले | (ii) | जुना कर्मणी |
| (c) | शिपायाकडून चोर पकडला जातो | (iii) | नवीन कर्मणी |
| (d) | नळे इंद्रासी असे बोलिजेले | (iv) | शक्य कर्मणी |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (i) | (iii) | (ii) |
| (2) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (3) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (4) | (i) | (iv) | (ii) | (iii) |

---

40. पुढील विधाने वाचा.

(a) च्, छ्, ज्, झ् हे तालव्य वर्ण आहेत.

(b) ए, ऐ हे कंठ तालव्य वर्ण आहेत.

(c) ट्, ठ्, ड्, ढ् हे मूर्धन्य वर्ण आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) व (b) बरोबर (2) केवळ (a) व (c) बरोबर

(3) केवळ (b) व (c) बरोबर (4) (a), (b), (c) तिन्हीही विधाने बरोबर

---

41. क्रियाविशेषणांचे प्रकार व उदाहरणे यातील विसंगत जोडी ओळखा.

(a) स्थलवाचक – लांबून, समोरून, मधून

(b) कालवाचक – काही, कधीही, क्रमशः

(c) संख्यावाचक – अतिशय, दोनदा, पुष्कळ

(d) रीतिवाचक – चटकन, आपोआप, भरभर

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) बरोबर (3) फक्त (c) चूक (4) फक्त (d) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

**42.** म्हणी आणि त्यांचे अर्थ यांच्या जोड्या लावा.

| | **म्हणी** | | **अर्थ** |
|---|---|---|---|
| (a) | डोळ्यात केर अन् कानात फुंकर | (i) | तजवीज केल्यास ते हास्यास्पद ठरते |
| (b) | द्राविडी प्राणायाम | (ii) | विनाकारण आटापिटा |
| (c) | कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ | (iii) | सामान्य गोष्ट ओळखण्यास अपात्र |
| (d) | गाजरपारखी | (iv) | देशद्रोही |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iv) | (iii) |
| (2) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (3) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (4) | (iii) | (iv) | (ii) | (i) |

**43.** जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | प्रत्ययघटित शब्द | (i) | कोणीकोणी |
| (b) | उपसर्गघटित शब्द | (ii) | भाजिविक्या |
| (c) | सामासिक शब्द | (iii) | भवितव्य |
| (d) | अभ्यस्त शब्द | (iv) | सरचिटणीस |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (2) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (3) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (4) | (i) | (iv) | (iii) | (ii) |

**44.** पुढील विधाने वाचा व **योग्य** उत्तर लिहा.

(a) अकारान्त, ईकारान्त व ऊकारान्त विशेषणांचे सामान्यरूप होत नाही.

(b) ई-कारान्त नपुंसकलिंगी नामांचे सामान्यरूप आकारान्त होते.

(c) अकारान्त पुल्लिंगी नामांचे सामान्यरूप ई-कारान्त होते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) चूक
(2) फक्त (b) व (c) चूक
(3) फक्त (a) व (b) बरोबर
(4) फक्त (a) व (b) चूक

**45.** पुढील विधाने वाचा.

(a) द्, फ् ही महाप्राण व्यंजने आहेत.

(b) स्, ख् ही अल्पप्राण व्यंजने आहेत.

(c) त्, थ् ही कठोर व्यंजने आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर
(2) फक्त (b) चूक
(3) फक्त (b) व (c) चूक
(4) फक्त (a) व (b) बरोबर

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

**खालील उतारा वाचून प्रश्न क्रमांक 46 ते 50 या प्रश्नांची उत्तरे द्या.**

'मी' हा हृदयघातकी दिसतो! पण का?

माणसाला इतरांपासून वेगळं पाडणाऱ्या गोष्टी एकटेपण व ताण निर्माण करतात व त्यातून बरेचदा हृदयरोग निर्माण होतो. याउलट माणसा-माणसांत प्रेम व नातं निर्माण करणाऱ्या गोष्टी, माणसाला निसर्गाशी, जगाशी जोडणाऱ्या गोष्टी माणसाच्या हृदयाला वाचवतात. माणसांचं माणसांशी तर सोडाच, पाळीव प्राणी व झाडांशी असलेलं भावनिक नातं देखील माणसाला हृदयरोगापासून संरक्षण देतं, असं वैज्ञानिक अध्ययनात आढळलं आहे.

संबंध (relationship) माणसाला हवासा वाटतो, नव्हे ती त्याच्या जगण्याची मूलभूत गरज आहे असं एरिक फ्रॉम नावाचा प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ म्हणतो. व्यक्तिकेंद्रित व स्पर्धेच्या आधुनिक (म्हणजे अमेरिकन) सभ्यतेत माणूस एकटा पडत जातो. गर्दीत असूनही एकटा, एकमेकांविरुद्ध स्पर्धक. घराबाहेर व्यावसायिक स्पर्धा, घरातही पती-पत्नीची एकाच भूमिकेसाठी, प्रभुत्वासाठी स्पर्धा. शेवटी अधिक यशासाठी स्वत:शी देखील स्पर्धा. या स्पर्धेचा सतत ताण. सर्वांशी तुटलेलं नातं. या संस्कृतीत जगण्यासाठी माणसाला 'मी' व 'माझं' यांचाच जप करावा लागतो. 'मी' हीच सर्वात मोठी विभूती होऊन तिचीच पूजा दिवस-रात्र चालते.

विकसित देशांपासून आम्ही उचललेली स्पर्धात्मक ('मुक्त'?) अर्थव्यवस्था यशस्वी होण्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या स्वार्थाला, लोभाला व महत्त्वाकांक्षेला भडकवावं लागतं, त्यात तेल ओतावं लागतं. स्वार्थ व लोभमूलक प्रेरणेतून 'प्रगती' साठी जिवापाड धावतांना जो मानसिक ताण निर्माण होतो, तो हृदयरोग निर्माण करतो. मुंबई, पुणे, नागपूरसारख्या शहरांमधे स्पर्धेचं जीवन जगणाऱ्यांना तर हे लागू पडतंच; पण गडचिरोलीच्या जंगलात जाऊन आरोग्याचं काम करणारा 'समाजसेवक' देखील यातून वाचू शकला नव्हता.

मी मोठा किंवा यशस्वी होणं म्हणजे मी इतरांपेक्षा कसा वेगळा, विशेष किंवा अधिक संपन्न हे सिद्ध करणं. इतरांसारखं, इतरांपैकी एक होणं म्हणजे साधारण होणं. असाधारण होण्यासाठी मला वेगळं बनावं लागतं. इतरांसोबतच्या माझ्या साधर्म्याऐवजी वेगळेपणावर भर द्यावा लागतो. यातूनच माझं एकलेपण निर्माण होतं, वाढतं. इतरांमधे व माझ्यामधे वेगळेपणाची पक्की भिंत तयार होते व ती भिंत बांधणारा मी स्वत:च त्या भिंतीच्या आत एकटा कैदी बनतो. कुणापासूनही असलं तरी एकटेपण घातक ठरतं. हृदयाला मारक ठरतं. अचानक माझ्या रोगाचं कारण मला लख्ख दिसायला लागलं!

अनेक वर्षांपूर्वी केव्हातरी, न कळत, मी माझं नैसर्गिक जीवन व प्रसन्न मन या आधुनिक संस्कृतीच्या हवाली केलं. त्यातून प्रथम शरीराचा उपयोग थांबला व त्याच्याकडे दुर्लक्ष सुरू झालं. मग अधिक काम व यश प्राप्तीच्या मागे लागून मनाची सहज अवस्था सुटली. बुद्धी व विचारांच्या वाळवंटात भावनिक अनुभव पारखा झाला. प्रसन्नता गेली. पुढे मनामधे 'मी व माझं' वाढत गेलं. त्यांचच कुंपण स्वत:भोवती निर्माण झालं व विश्वाशी असलेली एकरूपता तुटली आणि आश्चर्य म्हणजे विश्वस्वरूपाशी नाळ तुटल्यावर स्वत:शी असलेला संपर्कही सुटला. माझं स्वत:शीच नातं तुटलं होतं. माझं घर हरवलं होतं. माझ्या एकसंध निरोगी जीवनाचे तुकडे तुकडे पडले होते.

---

**46.** प्रस्तुत उताऱ्याची मध्यवर्ती कल्पना कोणती?

(1) आधुनिक सभ्यता व मुक्त अर्थव्यवस्था व्यक्तिविकासास मारक आहे.

(2) भौतिक सुखसमृद्धीसाठी कराव्या लागणाऱ्या धडपडीतून येणाऱ्या मानसिक तणावामुळे आरोग्याची हानी होणे.

(3) 'मी' व 'माझं' यांचा जप केल्यामुळे जीवनात समाधानाने जगता येणे.

(4) मी व विश्व यांची एकरूपता.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

47. व्यक्तीच्या एकटेपणाचे मूळ कोणत्या गोष्टीत आहे ?

(1) कोणत्याही कामात समाधानी नसणे.

(2) आत्मिक समाधान नष्ट होणे.

(3) 'स्व' चे इतरांपेक्षा असाधारण वैधर्म्य जपणे.

(4) निरोगी जीवन संपून जाणे.

---

48. माणसाला 'मी' व 'माझं' यांचा जप का करावासा वाटतो ?

(a) स्पर्धेच्या तणावामुळे

(b) स्वत:शी स्पर्धा करावी लागल्यामुळे

(c) 'मी' केंद्री व स्पर्धेच्या आधुनिक जीवनव्यवहारात टिकून राहण्यासाठी

(d) हृदयरोग टाळण्यासाठी

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (b) व (c) (2) फक्त (c)

(3) फक्त (a) (4) फक्त (d)

---

49. प्रस्तुत उताऱ्यास कोणते शीर्षक समर्पक वाटते ?

(1) स्पर्धेचे जग

(2) नैसर्गिक जीवन व हृदयरोग

(3) हृदयघातकी 'मी'

(4) स्वार्थी जगाचे आरोग्य

---

50. लेखकाच्या मते हृदयरोग निर्माण होतो कारण :

(a) 'स्व' व विश्वाशी असलेली एकरूपता तुटल्यामुळे.

(b) विकसित देशांकडून मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारल्यामुळे.

(c) स्वार्थी व लोभी मनोभावनेतून प्रगतीसाठी अतिरिक्त धडपड केल्यामुळे आलेले मानसिक ताण.

(d) जीवनात वेगळा व यशस्वी झाल्यामुळे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर (2) फक्त (b) व (c) बरोबर

(3) फक्त (d) चूक (4) फक्त (b) व (d) चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

51. Give synonym of the following word :
Counterfeit
(1) counterpart (2) forged (3) courageous (4) fine

52. A comma is used to _________.
Which one of the following **correctly** fills the blank in the sentence above ?
(1) separate phrases in apposition (2) coordinate clauses
(3) introduce a list (4) none of the above

53. In which one of the following sentence does the subject agree correctly with the verb ?
(1) Each man and each woman has a vote.
(2) Each man and each woman have a vote
(3) The ship was wrecked and every man, woman and child were drowned
(4) The ship was wrecked and every man, woman and child had drowned

54. Fill in the blanks with appropriate forms of verbs given in the brackets :
If we _________ (meet) at eight, we _________ (have) plenty of time.
(1) meet, have (2) will meet, have
(3) meet, will have (4) will meet, will have

55. The school was important to the community.
Pick out the **correct** meaning of the word underlined in the given context.
(1) significant (2) main (3) valuable (4) critical

56. He wants to cultivate his mind.
Identify the correct meaning of the underlined in the given context.
(1) grow (2) enrich (3) fertilize (4) keep sweet

57. Which one of the following sentence **correctly** expresses the probable (likely) condition ?
(1) If he works satisfactorily, he will be promoted.
(2) If he had worked satisfactorily, he could be promoted.
(3) Had he worked satisfactorily, he would have been promoted.
(4) If he worked satisfactorily, he would be promoted.

58. Choose one word that is most closely opposite in meaning to the capitalized word :
ADMONITION
(1) warning (2) threat (3) fear (4) request

59. Identify the **correct** sentence.
(a) She has been ill for two days.
(b) My daughter has written a letter to me last week.
**Asnwer options :**
(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

60. The _________ board does not allow the film producers to have any obscene scenes in their films.

Which one of the following words **correctly** fills the blank in the sentence above ?

(1) censer (2) censure (3) censor (4) censar

---

61. Identify the part of speech of the underlined word as it occurs in the sentence :

I am very interested in reading thrillers.

(1) Noun (2) Verb

(3) Adjective (4) None of the above

---

62. The boy who stole the watch was caught.

The underlined clause in the above sentence is _________.

(a) noun clause (b) adjective clause

(c) adverb clause (d) verb clause

**Answer options :**

(1) (a) only (2) (b) only (3) (a) and (c) (4) (d) only

---

63. Combine the two sentences to form a complex sentence :

(a) Let men sow anything.

(b) They will reap its fruits.

**Answer options :**

(1) Let men sow anything and they will reap its fruit.

(2) As man sow, so shall they reap.

(3) Let men sow something and they reap its fruits.

(4) As men will sow they will reap the fruit.

---

64. Which of the following sentences is **correct** ?

(1) They have been married for five years.

(2) They have been marrying for five years.

(3) They have been married since five years.

(4) They are married for five years.

---

65. Select from the alternative the word that conveys the same meaning as the word given in capital.

VENIAL

(1) contagious (2) filthy (3) worthless (4) excusable

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

66. Combine the two sentences to form a complex sentence.
   (a) A Fox once met a lion.
   (b) The Fox had never seen a lion before.
   **Answer options :**
   (1) A Fox who had never seen a lion before met him.
   (2) A Fox who have never saw a lion met him.
   (3) A Fox who has not see a lion meet him.
   (4) A Fox who did not saw a lion meat him.

---

67. Fill in the blank spaces with the best among the given options :
   If I _________ Rahul, I _________ a new battery.
   (1) am and will buy (2) was and would have bought
   (3) was and would buy (4) were and would buy

---

68. With which of the following words does the prefix "mis-" match correctly ?
   (a) sense (b) practice (c) manage (d) feed
   **Answer options :**
   (1) (a) only (2) (b) only (3) (c) only (4) (c) and (d)

---

69. Fill in the blanks with the most appropriate among the given options :
   The door- _________ needs to be replaced.
   The _________ on the road was heavy.
   **Answer options :**
   (1) jam and jamb (2) jamb and jam
   (3) jam and jam (4) jamb and jamb

---

70. Select the **odd** one from the following :
   (1) Home : Homely, Nose : Nasal (2) Cat : Feline, Boy : Boyish
   (3) Ear : Aural, Rain : Rainy (4) Fruit : Fruity, Music : Musicality

---

71. The word 'diligent' is antonymous with _________.
   (a) hard working (b) inert
   (c) lazy (d) indeterminate
   **Answer options :**
   (1) (a) only (2) (b) only
   (3) (c) only (4) both (c) and (d)

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

72. Ratnagiri is 120 km from here.
Choose the correct alternative that could be the **correct** Wh-question for the above sentence.
(1) How far is Ratnagiri from here ?
(2) How long is Ratnagiri from here ?
(3) How much long is Ratnagiri from here ?
(4) None of the above

---

73. Which mood is used in the following sentence ?
Go there.
(1) Indicative
(2) Imperative
(3) Subjunctive
(4) None of the above

---

74. Match the following :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | This is what I mean | (i) | Main clause |
| (b) | God helps those who help themselves | (ii) | Noun clause |
| (c) | Where there is life there is hope | (iii) | Adjective clause |
| (d) | She must weep or she will die | (iv) | Adverb clause |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (3) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (4) | (iii) | (ii) | (iv) | (i) |

---

75. Which of the following is **not** a verb of position ?
(1) lie (2) live (3) remain (4) glide

---

76. Fill in the blank space with the most suitable among the given options :
The matter could easily have been resolved, but neither his friends nor he ________ ready for any compromise.
(1) is (2) was (3) are (4) were

---

77. Choose the option that respectively gives the nearest meaning of the underlined words :
He wants to foil our plans.
She is the perfect foil of her husband.
(1) support and image
(2) frustrate and contrast
(3) destroy and cover
(4) examine and wife

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

78. Identify and write down the **correct** sentence from those given below :
   (1) He ate a large number of cakes and drank a great deal of tea.
   (2) He ate many cakes and drank much tea.
   (3) He ate many cakes and drank many teas.
   (4) He ate much cakes and drank many teas.

79. Fill in the blank :
   I asked ________ I could answer that question.
   (1) that (2) about
   (3) if (4) none of the above

80. From the given alternative choose the one that best expresses the meaning of the underlined idiom/phrase.
   In the beginning of his career, he was practically rolling in money.
   (1) wasting a lot of money (2) spending more than he was earning
   (3) very rich (4) saving a lot of money

81. Choose one word that is most closely opposite in meaning to the capitalized word :
   AUDACIOUS
   (1) Manifest (2) Obvious (3) Venture (4) Cowardly

82. In which one of the following sentences does the present tense express a future action when its futurity is clear from the context ?
   (1) College reopens on Monday. (2) Man is mortal.
   (3) Cows eat grass. (4) Sugar is sweet.

83. Change the sentence into positive degree.
   Shakuntala is better than any other drama in Sanskrit.
   (1) Shakuntala is the best drama in Sanskrit.
   (2) Shakuntala is best drama of Sanskrit.
   (3) No other drama in Sanskrit is so good as Shakuntala.
   (4) No other dramas of Sanskrit is good like Shakuntala.

84. Which one of the following is used as a prefix to - "devil" to form a compound noun ?
   (1) over_ (2) short_ (3) cut_ (4) dare_

85. Choose the **incorrectly** spelt word from the following given words :
   (1) autumn (2) condemn (3) augmanted (4) subsequent

86. Choose the most appropriate antonym for the underlined word :
   After so much of travel, a strange debility has set in.
   (1) energy (2) ability (3) boredom (4) futility

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

87. Is not wisdom better than riches ?
Which one of the following sentences **correctly** changes the interrogative sentence above into an assertive sentence ?
(1) Wisdom is much better than riches.
(2) Wisdom is not better than riches.
(3) Wisdom is the richest thing.
(4) No other thing is so good as wisdom.

---

88. Which among the given options is the most appropriate active voice form of the sentence below ?
The children were given a very tough question in class.
(1) A very tough question was given to the children in class.
(2) In class, a very tough question was given to the children.
(3) The question given to the children in class was very tough.
(4) The teacher gave the children a very tough question in class.

---

89. By and large India has some healthy democratic traditions.
Identify the **correct** meaning of the underlined.
(1) on the whole (2) by virtue of
(3) deliberately (4) at liberty

---

90. Choose the **correct** passive form of the following sentence.
It is time to shut the shop.
(1) It is time to be shut the shop.
(2) It is time for the shop to be shut.
(3) It is time that the shop should be shut.
(4) None of the above

---

91. Which of the given options comes nearest in meaning to the underlined word ?
He is an insufferable person.
(1) intolerable (2) one who has suffered much
(3) one who has not suffered much (4) one who cannot take much suffering

---

92. Choose the **correctly** spelt word :
(1) Intelect (2) Intellect (3) Intillect (4) Intelicte

---

93. Choose the most appropriate option for the underlined phrase :
He paid his wife a left-handed compliment.
(1) fulsome praise (2) quiet praise
(3) reproachful praise (4) delayed praise

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

**94.** Identify the odd one.
(a) proud : modest, disclose : suppress, dry : wet
(b) clumsy : adroit, fickle : steadfast, appoint : dismiss
(c) idle : deligent, boorish : refined, cordial : friendly
**Answer options :**
(1) Only (a) (2) Only (b)
(3) Only (c) (4) Only (b) and (c)

---

**95.** Select the **correct** sentence.
(a) They worked hard today in the garden.
(b) He lived there happily for a year.
**Answer options :**
(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

**Read the following passage carefully and answer the question number 96 to 100 given below it :**

Man's behaviour is influenced by two forces ; heredity and environment. The biological or psychological characteristics which are transmitted by the parents to their offsprings are known by the name of heredity. Heredity is, in other words, a biological process of transmission of certain traits of behaviour of the parents to their children, by means of the fertilized egg. In the nuclei of these parent cells are certain hair like substances called 'chromosomes'. The chromosomes contain chemical substances called genes. These basic substances, chromosomes and genes determine characteristic of the individual. And this is what constitutes heredity. The essential characteristic inherited by all human beings are physical structure, reflexes, innate drives, intelligence, and temperament. There are some biologists who claim that the difference in the traits or qualities of individuals or groups are due to the difference in their heredity. They are duly supported by some psychologists and sociologists in their assertion, that like begets like.

But there are others who explain that the variations of human beings and the societies are due to differences in environment. Thus a great controversy has been going since long about the relative importance of heredity and environment in determining the behaviour of individuals and groups. Though arguments have been advanced by the supporters of both heredity and environment, no exact conclusions with regard to the relative importance of the two factors have been drawn, nor is it possible either to determine the relative values of both.

Modern biology has long insisted that we are what our parents and grand parents have made us, that heredity counts far more than social opportunity. Not only is it impossible for a man to change his skin, but also he cannot change his outlook, his mode of thinking or behaviour because these too are hereditary. Others, on the other hand, belittle the importance of heredity.

---

**96.** Choose the **correct** statement.
Modern Biology states __________
(a) Man's behaviour is influenced by heredity at large.
(b) Environment and heredity equally influence man's behaviour.
**Answer options :**
(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

97. Choose the **correct** sentence.

(a) Chromosomes determine characteristic of the individual.

(b) Genes determine characteristic of the individual.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

98. The real physical matter of which a person consists is _________.

(1) heredity (2) chromosomes (3) structure (4) substance

---

99. Man's behaviour is influenced by two forces.

The active voice of the sentence is :

(1) Two forces influenced man's behaviour.

(2) Two forces influence man's behaviour

(3) Two forces have influenced man's behaviour.

(4) None of these

---

100. The opposition constantly belittled the government's achievements.

Pick out the **correct** meaning of the underlined verb.

(1) unimportant (2) magnify (3) praise (4) moderate

---

-o0o-

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

**सूचना** — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल, यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

SEAL

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

# परीक्षेचे नांव : राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०१६

**विषय : प्रश्नपुस्तिका - २ मराठी व इंग्रजी** **परीक्षेचा दिनांक : २४ सप्टेंबर, २०१६**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **"राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१६"** या स्पर्धा परीक्षेच्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नपत्रिकेची उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यासंदर्भात उमेदवारांनी अधिप्रमाणीत (Authentic) स्पष्टीकरण/संदर्भ देऊन पाठविलेली लेखी निवेदने, तसेच तज्ज्ञांचे अभिप्राय विचारात घेऊन आयोगाने उत्तरतालिका सुधारीत केली आहे. या उत्तरतालिकेतील उत्तरे अंतिम समजण्यात येतील. यापुढे यासंदर्भात आलेली निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत. तसेच त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

## उत्तरतालिका - KEY

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 1 | 2 | 3 | 1 | 1 |
| 2 | 3 | 3 | 1 | 2 |
| 3 | 4 | 4 | 2 | 2 |
| 4 | 1 | 1 | 1 | 2 |
| 5 | 3 | 1 | 3 | 4 |
| 6 | 3 | 3 | 4 | 1 |
| 7 | 3 | 1 | 4 | 2 |
| 8 | 3 | 1 | 1 | 3 |
| 9 | 1 | 3 | 4 | 3 |
| 10 | 4 | 1 | 1 | 1 |
| 11 | 3 | 2 | 1 | 1 |
| 12 | 2 | 4 | 3 | 1 |
| 13 | 1 | 3 | 3 | 3 |
| 14 | 2 | 2 | 3 | 1 |
| 15 | 1 | 2 | 3 | 2 |
| 16 | 3 | 3 | 3 | 1 |
| 17 | 3 | 4 | 3 | 3 |
| 18 | 1 | 1 | 2 | 3 |
| 19 | 1 | 1 | 4 | 2 |
| 20 | 3 | 2 | 4 | 1 |
| 21 | 2 | 2 | 2 | 2 |
| 22 | 4 | 1 | 3 | 2 |
| 23 | 1 | 3 | 1 | 1 |
| 24 | 1 | 1 | 3 | 4 |
| 25 | 4 | 3 | 2 | 3 |

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 26 | 2 | 2 | 2 | 3 |
| 27 | 4 | 1 | 1 | 4 |
| 28 | 3 | 1 | 4 | 1 |
| 29 | 3 | 4 | 1 | 2 |
| 30 | 4 | 3 | 1 | 1 |
| 31 | 2 | 2 | 3 | 1 |
| 32 | 1 | 2 | 1 | 2 |
| 33 | 4 | 3 | 1 | 3 |
| 34 | 1 | 2 | 1 | 4 |
| 35 | 3 | 1 | 3 | 1 |
| 36 | 1 | 4 | 3 | 4 |
| 37 | 3 | 4 | 1 | 3 |
| 38 | 2 | 1 | 4 | 3 |
| 39 | 1 | 4 | 2 | 3 |
| 40 | 4 | 4 | 2 | 4 |
| 41 | 2 | 2 | 3 | 1 |
| 42 | 1 | 3 | 2 | 3 |
| 43 | 1 | 3 | 2 | 3 |
| 44 | 2 | 3 | 4 | 4 |
| 45 | 2 | 1 | 2 | 4 |
| 46 | 2 | 2 | 2 | 2 |
| 47 | 3 | 4 | 3 | 3 |
| 48 | 2 | 3 | 3 | 3 |
| 49 | 3 | 3 | 2 | 4 |
| 50 | 4 | 2 | 4 | 2 |

**# दर्शविलेले प्रश्न रद्द करण्यात आलेले आहेत**

**प्रश्नपुस्तिका -2 मराठी व इंग्रजी** **दि. २१ डिसेंबर, २०१६**

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 51 | 2 | 1 | 4 | 1 |
| 52 | 1 | 3 | 2 | 3 |
| 53 | 1 | 2 | 3 | # |
| 54 | 3 | 3 | 1 | 1 |
| 55 | 3 | 1 | 1 | 4 |
| 56 | 2 | 3 | 3 | 1 |
| 57 | 1 | 2 | 4 | 2 |
| 58 | 4 | 3 | 1 | 3 |
| 59 | 1 | 1 | 1 | 3 |
| 60 | 3 | # | 2 | 1 |
| 61 | 1 | **4** | 2 | 2 |
| 62 | 2 | 2 | 1 | **3** |
| 63 | # | 4 | 4 | 1 |
| 64 | 1 | 3 | 4 | 3 |
| 65 | 4 | 4 | 1 | 1 |
| 66 | 1 | 4 | **3** | 3 |
| 67 | 4 | 2 | 1 | 2 |
| 68 | **4** | 4 | 2 | 3 |
| 69 | 2 | 3 | 1 | 1 |
| 70 | 4 | 4 | 1 | 2 |
| 71 | 3 | 4 | 1 | 3 |
| 72 | 1 | 1 | 2 | 4 |
| 73 | 2 | 1 | **4** | 2 |
| 74 | 3 | 1 | 3 | 3 |
| 75 | 4 | 3 | 2 | 4 |

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 76 | 2 | 1 | 1 | 3 |
| 77 | 2 | 4 | 1 | 1 |
| 78 | 1 | 4 | 3 | 2 |
| 79 | 3 | 1 | 2 | **4** |
| 80 | **3** | 3 | 2 | 3 |
| 81 | 4 | 2 | 4 | 1 |
| 82 | 1 | 2 | 3 | 4 |
| 83 | 3 | 3 | 3 | 2 |
| 84 | 4 | 1 | 2 | 1 |
| 85 | 3 | 2 | 4 | **3** |
| 86 | 1 | 2 | 1 | 4 |
| 87 | 1 | 1 | 3 | 1 |
| 88 | 4 | **3** | # | 1 |
| 89 | 1 | 1 | 4 | 1 |
| 90 | 2 | 2 | 4 | 2 |
| 91 | 1 | **3** | 3 | 4 |
| 92 | 2 | 1 | 3 | 2 |
| 93 | 3 | 3 | **3** | 4 |
| 94 | 3 | 1 | 1 | 4 |
| 95 | **3** | 1 | 3 | 1 |
| 96 | 1 | 1 | 2 | 1 |
| 97 | 3 | 1 | **2** | 2 |
| 98 | **2** | **2** | 1 | 3 |
| 99 | 2 | 2 | 1 | **2** |
| 100 | 1 | 3 | 3 | 1 |

# दर्शविलेले प्रश्न रद्द करण्यात आलेले आहेत

प्रश्नपुस्तिका -2 मराठी व इंग्रजी दि. २१ डिसेंबर, २०१६

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks